जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४७४ दिनांक - ०९/११/२०२४**

बिबवेवाडी पोलिस स्टेशन पुणे शहर

## एमपीडीए मधील चार महिन्यापासून फरार सराईत गुन्हेगार बिबवेवाडी पोलीसांच्या जाळयात

बिबवेवाडी पोलीस ठाणे चे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार नामे किरण राजू खवळे रा.गणेशनगर अप्पर बिबवेवाडी पुणे यास तडिपार करण्यात आलेले असताना सुध्दा त्याचे गुन्हेगारी कृत्य चालू असलेने त्यास मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.अमितेश कुमार यांनी चार महिन्यापुर्वी स्थानबध्द केले होते.स्थानबध्द केलेचे समजताच नमुद आरोपी चार महिन्यापासून फरार होता.

सदर दाखल गुन्हयातील आरोपीचा शोध घेणेबाबत मा.वरिष्ठांनी सुचना दिलेनंतर सदर नमुद आरोपींचा तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक अशोक येवले, पोलीस अमंलदार हे मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.शंकर साळुंखे,पोलीस निरीक्षक गुन्हे श्री.मनोजकुमार लोंढे यांचे मार्गदर्शनाखाली व त्यांनी दिलेल्या सुचनाप्रमाणे नमुद आरोपीचा शोध घेत असताना पोलीस अमंलदार शिवाजी येवले यांना, सदरचा आरोपी फुरसुंगी येथे राहत असल्याची खात्रीशीर बातमी मिळालेने मिळालेल्या बातमीवरून बिबवेवाडी पोलीस ठाणे तपास पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अमंलदार यांनी सापळा रचून स्थानबध्द इसम नामे किरण राजू खवळे रा.गणेशनगर अप्पर बिबवेवाडी पुणे.यास ताब्यात घेण्यात आले असून त्यास स्थानबध्दतेचा आदेश बजावून त्यास नाशिक मध्यवर्ती कारागृह येथे जमा करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त श्री.मनोज पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ ५ पुणे शहर, श्री.आर राजा, मा.सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग पुणे शहर श्री.धन्यकुमार गोडसे, यांचे मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बिबवेवाडी पो.स्टे. श्री.शंकर साळुंखे,पोलीस निरीक्षक गुन्हे श्री.मनोजकुमार लोंढे, तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक अशोक येवले, पोलीस हवालदार संजय गायकवाड, प्रशांत धोत्रे, संतोष जाधव, पोलीस अमंलदार ज्योतिष काळे, शिवाजी येवले, आशिष गायकवाड, सुमित ताकपेरे, प्रणय पाटील, अभिषेक धुमाळ, यांनी केली आहे.